### १) उर्वरित भारताच्या तुलनेत महाराष्ट्र

### २) महाराष्ट्रातील विविध क्षेत्राची वैशिष्ट्ये

**१) कृषी क्षेत्राची वैशिष्ट्ये**
**२) उद्योग क्षेत्राची वैशिष्ट्ये**
**३) सेवा क्षेत्राची वैशिष्ट्ये**

१) १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्याला केंद्र सरकारच्या कर उत्पन्नाचा ....... इतका वाटा मिळालेला आहे.
१) १७.९५९ २) ९.६६५ ३) ५.५२१ ४)७.५४८

### ३) विविध क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र सरकारची धोरणे

**१) कृषी क्षेत्राच्या विकासाचे धोरण**
**२) उद्योग क्षेत्राच्या विकासाचे धोरण**
**३) सेवा क्षेत्राच्या विकासाचे धोरण**

१) महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना कधी सुरु केली ?
१) जून २०१७ २) जुलै २०१६ ३) जून २०१८ ४) ऑगस्ट २०१७

२) महाराष्ट्रातील सिंचन घोटाळ्याच्या तपासासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली ...........साली विशेष तपास पथक (SIT) ची स्थापना केली.
१) २०१०-११ २) २०११-१२ ३) २०१३-१४ ४) २०१२-१३

३) खालील विधाने विचारात घ्या.
a) महाराष्ट्र राज्याने सेंद्रीय शेती धोरण जानेवारी २०१३ मध्ये जाहीर केले.
b) महाराष्ट्र राज्याने कृषी संजीवनी योजना २०११ मध्ये जाहीर केली.
c) महाराष्ट्र राज्याने शेती व्यवसाय पायाभूत विकास गुंतवणूक कार्यक्रम जागतिक बँकेच्या मदतीने सुरु केली.
वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **असत्य** आहे/त ?
१) (a) व (b) २) फक्त (a) ३) (b) व (c) ४) फक्त (c)

### ४) महाराष्ट्रातील दुष्काळ व्यवस्थापन

### ५) महाराष्ट्रामधील परकीय गुंतवणूक

१) महाराष्ट्राच्या २०१७-१८ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार सप्टेंबर २०१७ पर्यंत भारतातील एकूण परकीय थेट गुंतवणुकीत महाराष्ट्राचा वाटा किती आहे ?

१) ३१%　　２) २५%　　३) ३९%　　४) २१%

२) महाराष्ट्रात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक प्रकल्पात झालेल्या गुंतवणुकीमध्ये खालीलपैकी कोणत्या क्षेत्राचा प्रथम क्रमांक लागतो ?

१) हॉटेल व पर्यटन उद्योग क्षेत्र　　२) वित्तीय सेवा क्षेत्र

३) व्यवसाय व्यवस्थापन सल्लाविषयक क्षेत्र　　४) माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र

# (३) कृषी अर्थव्यवस्था

## (१) भारतीय शेती व ग्रामीण विकास

१) आर्थिक विकासात शेतीची भूमिका
२) शेतीचे प्रकार
३) कृषी उत्पादकता व उत्पादन वाढीसाठी शासकीय धोरणे, योजना आणि कार्यक्रम
४) भारत व महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा विकास
५) कृषी संशोधन
६) ग्रामीण विकास

### १) आर्थिक विकासात शेतीची भूमिका

**१) राष्ट्रीय उत्पन्न आणि रोजगारामध्ये शेतीचे योगदान**
**२) शेती, उद्योग व सेवा क्षेत्रांमधील आंतरसंबंध**
**३) भारतातील कृषी विकासातील प्रादेशिक असमानता**

१) भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राच्या भूमिकेसंबंधी खाली काही विधाने देण्यात आली आहेत. यातील योग्य विधान/विधानांची निवड करा.

a) १९७२-१९७३ मध्ये भारताच्या काम करणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी ७३.९% लोक शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसायामध्ये गुंतलेले होते. हे प्रमाण कमी होऊन १९९३-१९९४ मध्ये ६४.८% तर २०११-२०१२ मध्ये ४८.९% पर्यंत खाली आले.

b) कृषी क्षेत्राच्या विकासाशिवाय देशातील उद्योगधंदे अविकसित (मागास) राहतात.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (b) योग्य आहेत　　२) फक्त (a) योग्य आहे

३) फक्त (b) योग्य आहे　　४) (a) आणि (b) अयोग्य आहेत

### २) शेतीचे प्रकार

**१) कंत्राटी शेती**
**२) उपग्रह शेती**
**३) कॉर्पोरेट शेती**

## ४) सेंद्रिय शेती

१) राष्ट्रीय सेंद्रीय शेती प्रकल्प योजनेची ........ हे/ही मुख्य उद्दिष्ट/उद्दिष्ट्ये आहेत/आहे.
१) सेवा पुरविणाऱ्यांच्या मार्फत क्षमता विकसित करणे.
२) प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून मानवी संसाधनांचा विकास करणे.
३) सेंद्रीय आदानांची गुणवत्तेवर नियंत्रण करणे.
४) वरील सर्व

## ३) कृषी उत्पादकता व उत्पादन वाढीसाठी शासकीय धोरणे, योजना आणि कार्यक्रम

**१) भारतातील कमी कृषी उत्पादनक्षमतेची कारणे – मूलभूत शेतीविषयक निविष्ठा, शेतीचे आकारमान**
**२) हरित क्रांती व तंत्रज्ञान विषयक बदल, जनुकीय सुधारणा तंत्रज्ञान**
**३) शेतीचे यांत्रिकीकरण**
**४) शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्याबाबत शासकीय धोरण**
**५) विविध पिक विमा योजना**

१) खालील विधाने भारतीय हरितक्रांती विषयीची आहेत.
a) पिकांच्या आकृतिबंधात बदल झाला.
b) शेती आणि उद्योगधंद्यामधील आंतर–जोडणी मजबूत झाली.
c) हरितक्रांतीचा फायदा झालेली गहू आणि तांदूळ ही दोन पिके आहेत.
वरीलपैकी कोणते विधान/विधाने खरी आहेत ?
१) सर्व (a), (b) आणि (c) २) फक्त (c) ३) फक्त (a) ४) (a) आणि (c)

२) खालील विधाने भारतीय शेतीविषयक आहेत.
a) प्रती हेक्टर उत्पादनाच्या आधारे गहू या पिकाचा प्रथम क्रमांक लागतो.
b) एकूण उत्पादनाच्या आधारे तांदूळ या पिकाचा प्रथम क्रमांक लागतो.
खालील कोणता पर्याय बरोबर आहे ?
१) दोन्ही विधाने बरोबर आहेत २) दोन्ही विधाने चुकीची आहेत.
३) फक्त विधान (a) खरे आहे. ४) फक्त विधान (b) खरे आहे.

३) शेण खतांमध्ये ........... टक्के नत्र असते.
१) ९.३० २) ०.५० ३) १६.०० ४) ४६.४०

४) १९५०–१९५१ मध्ये भारतातील खताचा प्रतिहेक्टरी वापर नगण्य होता. मात्र २०१४–२०१५ मध्ये हा वापर .......... किलोपर्यंत प्रतिहेक्टरी वाढला.
१) २०० किग्रॅ. २) १२५.४ किग्रॅ. ३) ५०० किग्रॅ. ४) ४३५.५ किग्रॅ.

५) भारत सरकारने २००४ मध्ये बियाणे विधेयक २००४' सादर केले. या विधेयकाची वैशिष्ट्ये .........
१) बियाणांच्या जातीची त्याच्या उत्पादक क्षमतेनुसार सक्तीची नोंदणी.
२) बियाणांची आयात – निर्यात करण्यासाठीची नियमावली
३) शेतकऱ्यांना त्यांच्याकडील बियाणे जतन करणे, त्याचा वापर करणे, अदलाबदल करणे, वाटून घेणे आणि विक्री करणे यासाठी नोंदणीपासून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यात आली.
४) वरील सर्व

६) मिशन २०२२ : आगामी पाच वर्षात भारतीय शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे. यासाठी प्रधानमंत्री यांनी खालील धोरण निश्चित केले आहे. यातील योग्य पर्यायांची निवड करा.

a) जलसंधारणासाठी मोदी अर्थसंकल्पीय तरतूद करुन जलसंधारणावर लक्ष केंद्रित करणे. प्रत्येक थेंब–जास्त पीक या ध्येयासाठी प्रयत्न करणे.

b) काढणी पश्चात पिकांची हानी टाळण्यासाठी साठवणगृहासाठी मोठी गुंतवणूक करणे आणि शीतगृहांची साखळी निर्माण करणे.

c) परवडणाऱ्या खर्चात शेती क्षेत्रातील धोका कमी करण्यासाठी नवीन पीक विमा योजना सुरु करणे.

d) गुणवत्तापूर्ण बियाणांची तरतूद करणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (b) योग्य आहेत २) (c) आणि (d) योग्य आहेत
३) (a) आणि (d) योग्य आहेत ४) वरील सर्व योग्य आहेत

## ४) भारत व महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा विकास

**१) जमीन सुधारणा आणि जमीन वापर**
**२) जलसिंचन आणि जलव्यवस्थापन**
**३) फलोत्पादन व पुष्पोत्पादन विकास**
**४) पशुधन आणि त्याची उत्पादकता**
**५) वनीकरण**
**६) मत्स्यव्यवसाय**

## १) जमीन सुधारणा आणि जमीन वापर

१) मशागत योग्य पडीक जमिनीचे महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक क्षेत्राशी ........ % एवढे प्रमाण आहे.
१) २.९८ २) २४.०५ ३) १४.४५ ४) १०.४८

२) .......... प्रकारची भूमी स्वामित्व प्रणाली सर्वप्रथम १७९२ मध्ये मद्रास प्रांतात सुरु झाली.
१) रयतवारी २) जमीनदारी ३) महालवारी ४) वरीलपैकी कोणतेही नाही

३) महाराष्ट्रात सामान्यत: कोणती व्यापारी/नगदी पिके खरीप हंगामात घेतली जातात ?
१) कापूस, सोयाबीन, गहू, हरभरा २) कापूस, सोयाबीन, भुईमूग, ऊस
३) कापूस, सोयाबीन, जवस, हरभरा ४) कापूस, सोयाबीन, कडधान्ये, ज्वारी

## २) जलसिंचन आणि जलव्यवस्थापन

**१) मृद आणि जलसंधारण**
**२) पर्जन्य शेती**
**३) सिंचन आणि त्याच्या पद्धती**

१) भारतातील शेती सिंचनाचा सर्वात मोठा स्त्रोत कोणता ?
१) कालवे २) विहिरी ३) तलाव ४) वरीलपैकी कोणताही नाही

२) मृद व जल संधारण विभागातर्फे ............... या योजनेला नाबार्ड मार्फत २०००–२००१ सालापासून कर्जपुरवठा केला जातो.
१) ए आय बी पी २) डब्ल्यू डी पी एस सी ए

३) आर आय डी एफ    ४) आर व्ही पी आणि एफ पी आर

## ३) फलोत्पादन व पुष्पोत्पादन विकास

१) .......... हे/हा कार्यक्रम १२ व्या (२०१२-२०१७) पंचवार्षिक योजनेनुसार एकात्मिक फळबाग विकास कार्यक्रमाचा भाग आहे/आहेत.

a) ईशान्य भारतीय प्रदेश आणि हिमालय फळबाग अभियान (HMNEH)

b) राष्ट्रीय बांबू अभियान (NBM)

c) नारळ विकास मंडळ(CDB)

d) राष्ट्रीय फळबाग अभियान (NHM)

**पर्यायी उत्तरे :**

१) (a), (b) आणि (d)    २) (a),(c) आणि (d)    ३) (a), (b),(c) आणि (d)    ४) (b),(c) आणि (d)

## भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा : अभ्यासक्रमात नमूद विषय व उपविषय

**१) भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा**
**२) भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने**
**३) भारतातील नियोजन**
**४) भारतातील आर्थिक सुधारणा**

### १) भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा

### २) भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने

१) दारिद्र्य निर्मूलनाचे उपाय
२) बेरोजगारी निर्मूलनाचे उपाय
३) प्रादेशिक असमतोल

### ३) भारतातील नियोजन

१) नियोजनाचे प्रकार व तर्काधार
२) नियोजन आयोग
३) नीती आयोग

### ४) भारतातील आर्थिक सुधारणा

१) आर्थिक सुधारणांची पार्श्वभूमी
२) उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण – संकल्पना, अर्थ, व्याप्ती व मर्यादा
३) केंद्र आणि राज्यातील सुधारणांची असमानता

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील दारिद्र्य, बेरोजगारी आणि प्रादेशिक विषमता या आव्हानांचा अभ्यास करताना दारिद्र्याची रेषा ठरविण्या संदर्भातील महत्त्वाची मानके, समित्या व अहवाल, दारिद्र्याची कारणे व त्यावरील उपाय यांचा अभ्यास करावा. दारिद्र्यनिर्मूलनाच्या कार्यक्रमाचा अभ्यास अधिक नेमकेपणाने आणि सद्य:स्थितीच्या संदर्भासह करावा. बेरोजगारी, प्रादेशिक विषमता या आव्हानांचे स्वरूप, त्यांची कारणे आणि त्यासंदर्भातील महत्त्वाचे शासकीय कार्यक्रम, धोरणे आणि यंत्रणा यांची नेमकी माहिती अधिकृत आकडेवारीसह अद्ययावत करावी.

२०११ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी *विजय केळकर* यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्राच्या प्रादेशिक असमतोलाचे मोजमाप करण्यासाठी समिती नेमली. यापूर्वी नेमण्यात आलेली *वि. म. दांडेकर समिती, भुजंगराव कुलकर्णी समिती* आणि उच्च स्तरीय अभ्यासगट यांनी वेगवेगळे निकष लावून प्रादेशिक असमतोल मोजण्याचा प्रयत्न केला आणि त्यावर उपायही सुचविले. असमतोलाची कारणे, परिणाम व त्याचा वेगळ्या विदर्भाच्या मागणीवर असलेला प्रभाव अभ्यासावा.

केंद्रीय पंचवार्षिक नियोजनाची प्रक्रिया सुमारे दीड वर्षे सुरू असते. नियोजनाचे अनेक प्रकार आहेत – अंशलक्ष्यी नियोजन, परिलक्ष्यी नियोजन, विकेंद्रित नियोजन, इ. भारताने रशियाकडून नियोजन स्वीकारले तरी त्याची अनेक मॉडेल्स – हेरॉड–डोमर, महालनोबीस, ॲलन–रुद्र, वकील–ब्रह्मानंद, राव–मनमोहन, नवगांधीवाद–इत्यादी भारतातच विकसित झाली.

नियोजनाचा आढावा घेताना पुढील मुद्दे विचारात घ्यावेत – योजनांचा कालावधी, योजनांना मान्यता देणारे सरकार, त्या काळातील पंतप्रधान व योजना आयोगाचे उपाध्यक्ष, आकारमान, घोषवाक्य, उद्दिष्ट, विविध घटकावरील तरतुदी, सुरू केलेल्या योजना, भांडवल निर्मितीचे विविध स्रोत, सुरू झालेले कारखाने व धरणे, निर्माण झालेली राज्ये, साध्य झालेली उद्दिष्टे, नेमलेल्या आलेल्या विविध समित्या व योजनेचे यशापयश, इत्यादी.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून भारतात विकेंद्रित नियोजन सुरू झाले. १९६१ साली राज्याची योजना वेगळी, तर १९७४ पासून जिल्हा नियोजनाला सुरुवात झाली. ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीने राज्य वित्त आयोगाची, तसेच ७४ व्या घटनादुरुस्तीने *'जिल्हा नियोजन समितीची निर्मिती'* झाल्याने खालून – वर या प्रकारचे नियोजन सुरू झाले. त्यावर आधारीत विशेषतः जिल्हा नियोजन आयोगाची रचना, निवडणुका, त्याचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सदस्य, अधिकार व इतर बाबींवर प्रश्न विचारले जातात.

१९९१ पासून सुरू झालेल्या आर्थिक सुधारणांना २०१४ मध्ये २५ वर्षे झाली. या सुधारणा दोन टप्प्यात अमलात आल्या. त्यातील पहिला टप्पा नवव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात संपला. दुसरा टप्पा २००२ पासून सुरू झाला.

भारतातील 'एलपीजी मॉडेल' हे जगातील इतर मॉडेलपेक्षा वेगळे आहे. चीनच्या 'शांघाय' मॉडेलपेक्षा हे मॉडेल मानवी चेहरा असलेले मॉडेल मानले जाते आणि विकासाचा लाभ सर्वसामान्यापर्यंत पोहोचला पाहिजे हे उद्दिष्ट लक्षात घेऊनच भारतात सध्या आर्थिक सुधारणा टप्प्याटप्प्याने अमलात आणल्या जात आहेत.

आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीचा आढावा घेताना आर्थिक सुधारणांच्या पूर्वेच्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय घडामोडींची माहिती तपशीलवार वाचावी. उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या संकल्पनांचे अचूक आकलन यावर कशाप्रकारचे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न विचारले जाऊ शकतात या दृष्टीने करावे. आर्थिक सुधारणां मधील समाविष्ट विविध धोरणे व तरतुदी यांची माहिती मिळवावी. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण धोरणाचा प्रभाव व मर्यादा यांचे आकलन वस्तुनिष्ठरीत्या करावे. त्यासंदर्भातील वृत्तपत्रांतील आणि विविध नियतकालिकांतील अर्थविषयक लेखांचे वाचन करावे.

केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणांचा संबंध मुख्यत्वे करप्रणाली, अर्थसंकल्प उत्तरदायित्व, सार्वजनिक खर्चाचे लोकाभिमुख धोरण, याबाबत आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा : घटक आणि उपघटकावरील प्रश्नसंख्या**

| *घटक –उपघटक/ प्रश्न व गुणसंख्या* | *२०१२* | *२०१३* | *२०१४* | *२०१५* | *२०१६* | *२०१७* | *२०१८* | *२०१९* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उपविषय – १ : भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा** | | | | | | | | |
| **१) भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा** | – | – | १ | १ | १ | – | – | – |
| **२) भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने** | | | | | | | | |
| दारिद्र्य निर्मूलनाच्या उपाययोजना | १ | – | २ | १ | १ | २ | १ | १ |
| बेरोजगारीसंबंधात उपाययोजना | ३ | १ | २ | २ | ४ | ३ | २ | ३ |
| प्रादेशिक असमतोल | – | १ | २ | – | – | – | – | – |
| **३) भारतातील नियोजन** | | | | | | | | |
| नियोजन : प्रक्रिया प्रकार | – | १ | १ | २ | – | २ | १ | १ |
| भारताच्या पंचवार्षिक योजनांचा आढावा, मूल्यमापन | २ | ६ | २ | – | ३ | – | १ | १ |
| **४) भारतातील आर्थिक सुधारणा** | | | | | | | | |
| शिथिलीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण | ४ | २ | २ | ४ | २ | २ | ३ | २ |
| केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणा | २ | – | – | २ | २ | १ | ३ | २ |
| *एकूण* | *१२* | *११* | *१२* | *१२* | *१३* | *१०* | *११* | *१०* |

# १) भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा

# २) भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने

१) दारिद्र्य निर्मूलनाचे उपाय

२) बेरोजगारी निर्मूलनाचे उपाय

३) प्रादेशिक असमतोल

## १) दारिद्य निर्मूलनाचे उपाय

१) खालीलपैकी कोणत्या पंतप्रधानानी दिवंगत इंदिरा गांधी यांनी दारिद्र्य निर्मूलनासाठी जाहीर केलेल्या २०-कलमी कार्यक्रमाची पुनर्रचना केली ?

१) राजीव गांधी  २) नरसिंह राव  ३) व्ही. पी. सिंग  ४) वरीलपैकी कोणीही नाही

२) खालीलपैकी कोणते धोरण भारतातील दारिद्र्य निर्मूलनासाठी योग्य आहे ?

a) i) साकलिक कृषी विकास

ii) साकलिक क्षेत्रातील उत्पादकता आणि रोजगार गुणवत्ता वाढविणे

iii) शिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे गरिबांचे उत्थान करणे.

iv) चांगल्या आरोग्याच्या तरतुदीद्वारे उत्थान करणे.

b) i) गृहनिर्मितीसाठी तरतूद करणे.

ii) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे

iii) कौशल्य निर्मितीतून दारिद्र्य निर्मूलन

iv) चांगल्या वेतनदराची हमी देणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) योग्य आहे  २) फक्त (b) योग्य आहे

३) (a) आणि (b) दोन्हीही योग्य नाहीत.  ४) (a) आणि (b) दोन्हीही योग्य आहेत.

३) दारिद्र्य निर्मूलनासंदर्भात खालीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत ?

a) आर्थिक सुधारणानंतर ग्रामीण दारिद्र्यात घट झाली.

b) आर्थिक सुधारणानंतर ग्रामीण विकासात साचलेपणा आला.

c) आर्थिक विकासातील साचलेपणामुळे ग्रामीण दारिद्र्य कमी झालेले नाही.

d) ग्रामीण दारिद्र्य निर्मूलन योजनांचा ग्रामीण सामाजिक कल्याणावर विशेष परिणाम झाला नाही.

वरील योग्य विधान/विधाने निवडा.

१) (a), (b) आणि (c)  २) (a), (b) आणि (d)  ३) (b), (c) आणि (d)  ४) वरील सर्व

४) खालीलपैकी कोणते/ती विधान/ने योग्य आहे/आहेत ?

a) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाचा उद्देश गरिबांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे हा आहे.

b) भारत सरकारने राष्ट्रीय कृषी विकास योजना दारिद्र्य निर्मूलनाच्या हेतूने सुरु केली.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a)  २) फक्त (b)  ३) (a) आणि (b)  ४) एकही नाही

५) भारतातील ग्रामीण दारिद्र्य दूर करण्यासाठी कोणता कार्यक्रम जाहीर करण्यात आला?

१) वीस कलमी कार्यक्रम  २) किमान गरजा कार्यक्रम

३) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम  ४) वरील सर्व

६) पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य** आहे ?

a) २००८ पासून सुरु झालेली राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येसाठी लागू होते.

b) लाभार्थींना इस्पितळातील ३०,००० खर्चाची जवळपास सर्व आजारांसाठी कुटुंबातील ४ व्यक्तींसाठी मुभा आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) केवळ (a)  २) केवळ (b)  ३) दोन्ही  ४) एकही नाही

७) भारत सरकारच्या खालीलपैकी दारिद्र्य-निवारणाच्या कोणत्या कार्यक्रमाअंतर्गत गरिबांना कमी दरात धान्य दिले

गेले?

१) एन.आर.इ.पी. २) आय.आर.डी.पी. ३) एस.जे.जी.वाय. ४) पी.डी.एस.

८) भारत सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी स्वीकारलेल्या त्रि–आयामी दृष्टिकोनात खालीलपैकी कोणाचा समावेश होत नाही?

१) किमान मूलभूत सुविधांची तरतूद २) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

३) वृद्धीधारित दृष्टिकोन ४) गरिबी अनुदान दृष्टिकोन

९) अकराव्या पंचवार्षिक योजनेत दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींचे प्रमाण कमी करण्याबाबत निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट होते :

१) दरवर्षी १ टक्क्याप्रमाणे पंचवार्षिक योजनेच्या काळात ५%

२) दरवर्षी २ टक्क्याप्रमाणे पंचवार्षिक योजनेच्या काळात १0%

३) पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षाच्या काळात प्रत्येकी १%, नंतरच्या तीन वर्षांच्या काळात २% याप्रमाणे एकूण १0%

४) वरीलपैकी कोणतेही नाही.

## २) बेरोजगारी निर्मूलनाचे उपाय

१) भारत सरकारने सुरू केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमात केंद्र व राज्य सरकारच्या मदतीच्या हिश्याचे प्रमाण ...... आहे.

१) ५0 : ५0 २) ८५ : १५ ३) ७0 : ३0 ४) ६0 : ४0

२) खालीलपैकी कोणते/ती विधान/ने योग्य आहे/आहेत ?

a) २0१२–१३ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार संघटित क्षेत्रातील रोजगार निर्मितीचा वेग २0११ मध्ये १.0% वाढला.

b) २00९–११ या कालावधीत संघटित क्षेत्रातील महिलांची रोजगार संख्या जवळपास २0.५% होती.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) २) फक्त (b) ३) (a) आणि (b) ४) एकही नाही

३) खालील विधाने विचारात घ्या :

a) २00१ मध्ये १0 दशलक्ष रोजगार संधी ध्येय गाठण्यासाठी नियोजन मंडळाने एस. पी. गुप्ता विशेष गटाची स्थापना केली.

b) सन २0११–१२ मध्ये शेती क्षेत्रात अंदाजे ८0% सर्व प्रकाराचा रोजगार देण्यात येईल.

c) ११ व्या योजनेत जवळपास ५२ दशलक्ष श्रमशक्तीतील वाढ अपेक्षीत आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त?

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) व (b) २) (a) व (c) ३) (b) व (c) ४) फक्त (b)

४) भगवती समितीच्या १९७३ च्या अहवालानुसार सरकारने रोजगार पुरविण्यासाठी खालील उपाय योजना सुरू केल्या.

a) ग्रामीण कार्य कार्यक्रम b) कृषी–सेवा केंद्र

c) क्षेत्र–विकास कार्यक्रम d) किसान क्रेडिट कार्ड योजना

वरीलपैकी कोणता/ते पर्याय **चुकीचा/चे** आहे/आहेत ?

१) (a) आणि (b) २) (b) आणि (d) ३) फक्त (c) ४) फक्त (d)

५) भारतातील रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि त्यांच्या प्रारंभ/घोषणा दिनांक–वर्ष खाली दिलेले आहे. योग्य जोड्या लावा.

| **युनिट – I** | **युनिट – II** |
|---|---|
| a) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) | i) डिसेंबर १, १९९७ |

b) प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP)    ii) ऑगस्ट २०१३

c) स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (SJSRY)    iii) डिसेंबर २५,२०००

d) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSS)    iv) ऑगस्ट १४, २००८

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| २) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| ३) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| ४) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

६) खालीलपैकी बिगर रोजगार योजना ओळखा.

१) ग्रामीण काम योजना    २) भाग विकास योजना

३) एकात्मिक कोरडवाहू कृषी योजना    ४) वरीलपैकी एकही नाही

७) १९८० च्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट काय होते?

१) ग्रामीण युवकांना स्वयं रोजगारासाठी बीज भांडवलाचा पुरवठा करणे.

२) ग्रामीण युवकांना स्वयं रोजगारासाठी प्रशिक्षणाच्या सुविधा पुरविणे.

३) ग्रामीण भागातील गरीब लोकांना रोजगाराच्या संधी पुरविणे.

४) सुशिक्षित बेरोजगारांना तांत्रिक मदत पुरविणे.

८) देशातील ग्रामीण व शहरी दोन्ही भागात खालीलपैकी कोणत्या योजनेचा विस्तार करण्यात आला ?

१) जवाहर रोजगार योजना    २) नेहरू रोजगार योजना

३) जे. पी. नारायण रोजगार गॅरण्टी योजना    ४) प्रधान मंत्री रोजगार योजना

९) पुढील विधानांचा विचार करा :

आश्वासित रोजगार योजना – १९९३ च्या संदर्भात :

**विधान (I)** : हंगामी बेरोजगारी दूर करण्यासाठी ग्रामीण भागात रहिवासी ठिकाणीच १०० दिवस अकुशल शारीरिक रोजगार उपलब्ध करणे.

**विधान (II) :** टिकाऊ सामुदायिक, सामाजिक व आर्थिक मालमत्ता निर्माण करून भविष्यात रोजगाराची शक्यता निर्माण करणे.

**आता सांगा :**

१) विधान (I) बरोबर, विधान (II) चूक    २) विधान (II) बरोबर, विधान (I) चूक

३) दोन्ही विधाने बरोबर    ४) दोन्ही विधाने चूक

## स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

१) १ एप्रिल, १९९९ रोजी स्वर्णजयंती ग्राम स्व-रोजगार योजना कोणत्या योजनांच्या एकत्रीकरणाने सुरू झाली?

१) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री ग्रामोदय योजना, ग्राम कल्याण योजना, इंदिरा महिला योजना.

२) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ग्राम कल्याण योजना, ट्रायसेम, सिटरा (SITRA) दशलक्ष विहिरी योजना.

३) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ट्रायसेम, स्त्रिया व बालके विकास कार्यक्रम, इंदिरा महिला योजना.

४) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना, जवाहर ग्राम समृद्धी योजना, ट्रायसेम, संपूर्ण रोजगार योजना

२) १ एप्रिल, १९९९ मध्ये स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना ही व्यापक योजना सुरु करण्यात आली. त्यात खालीलपैकी कोणती योजना विलीन करण्यात आली नाही?

१) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम    २) दशलक्ष विहीर योजना

३) पंतप्रधान रोजगार योजना ४) गंगा कल्याण योजना

## स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना

१) डिसेंबर १९९७ पासून सुरु झालेली स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना ही खालीलपैकी कोणत्या योजनांचे एकत्रीकरण आहेत ?

१) नेहरू रोजगार योजना, गरिबांची नागरी मूलभूत सुविधा योजना आणि प्रधानमंत्र्यांच्या एकात्मिक नागरी दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

२) जवाहर ग्राम समृद्धी योजना, कामासाठी अन्नधान्य कार्यक्रम आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम.

३) स्वर्णजयंती ग्राम स्व-रोजगार योजना, ट्रायसेम आणि कृषी सेवा केंद्र

४) वरीलपैकी काहीही नाही

## मनरेगा व रोजगार हमी योजना

१) घटनेत नमूद केलेला 'कामाचा अधिकार' सर्वप्रथम मिळवून देणारी भारतातील रोजगार उपक्रम/योजना कोणती?

१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना (NREP)

२) म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा (MGNREGA)

३) महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना (EGS)

४) जवाहर रोजगार योजना (JRY)

२) खालीलपैकी कोणता घटक ''रोजगारी हमी कायदा - २००५'' चा भाग नाही ?

१) कुटुंबातील किमान एका प्रौढाला रोजगार दिला जाईल.

२) मागणी केल्यावर १५ दिवसाच्या आत रोजगार पुरवला गेला नाही तर बेरोजगारी भत्ता म्हणून रोज किमान वेतन दिले जाईल.

३) वेतनातील ५% समाज कल्याण योजनांसाठी योगदान म्हणून कमी केले जातील.

४) या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस जिल्हाधिकारी जबाबदार राहील.

३) खालील विधाने विचारात घ्या :

a) मनरेगा योजना सप्टेंबर २००५ मध्ये अधिसूचित करण्यात आली.

b) मनरेगा योजनेची अंमलबजावणी करणारी ग्रामपंचायत ही महत्त्वपूर्ण संस्था आहे.

c) मनरेगाच्या लाभार्थींना दिली जाणारी देयके फक्त रोख रक्कम स्वरूपात दिली जातात.

वरील कोणते/ती विधाने/ने बरोबर आहे/आहेत ?

१) (a) आणि (b) २) (b) आणि (c) ३) (a), (b) आणि (c) ४) फक्त (b)

४) मनरेगाच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान खरे **नाही?**

१) या योजनेच्या लाभार्थींपैकी कमीत कमी ३३% लाभार्थी महिला असणे आवश्यक आहे.

२) वेतनाचे वाटप हे केवळ बँक आणि पोस्ट ऑफिस खात्यातूनच व्हायला हवे.

३) ही योजना ग्रामीण कुटुंबातील सर्व प्रौढांना कमीत कमी १०० दिवसांचा वेतन रोजगार पुरवते.

४) ही योजना श्रम प्रधान (labour intensive) कामे पुरवते.

५) **योग्य** पर्याय निवडा.

भारत सरकारच्या रोजगार हमी कायदा २००४ मधील तरतुदी.

a) वर्षातून १०० दिवस रोजगाराची हमी.

b) रोजगार निर्मितीसाठी सार्वजनिक कामे करणे.

c) रोजगार करणाऱ्या व्यक्तीला किमान वेतनाची हमी.

**पर्यायी उत्तरे :**

१) वरील सर्व चूक २) वरील सर्व बरोबर ३) (a) व (b) बरोबर ४) केवळ (c) बरोबर

६) महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत होणाऱ्या खर्चाच्या विभागणीच्या संदर्भात खालील पर्यायांपैकी कोणता पर्याय बरोबर आहे ?

१) ७५% केंद्र सरकार आणि २५% राज्यसरकार २) ५०–५०% केंद्र आणि राज्य सरकार
३) १00% केंद्र सरकार ४) १00% राज्य सरकार

७) खालील विधाने विचारात घ्या :

a) महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजना १९७२–७३ मध्ये सुरू केली.
b) या योजनेचा १९७७–७८ ते १९८७–८८ या कालावधी मध्ये दारिद्र्य ६0.४% वरून ३६.७% पर्यंत कमी करण्यात सहभाग होता.
c) रोजगार हमी योजनेचा सर्वात जास्त फायदा फक्त पुरुषांना झाला.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/आहेत ?

१) (a) आणि (b) २) (b) आणि (c) ३) (a) आणि (c) ४) फक्त (c)

## भारतातील बेरोजगारीचे स्वरुप

१) NSSO ने दिलेल्या बेरोजगारीच्या व्याख्येनुसार दीर्घकालीन बेरोजगारी म्हणजे बेरोजगारीची ......

१) नित्य प्रमुख अवस्था २) साप्ताहिक अवस्था ३) दैनिक अवस्था ४) अर्ध रोजगारी

२) राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेने मांडलेल्या नित्य स्थिती बेरोजगारीच्या संदर्भातील खालील विधानांपैकी कोणती विधाने खरी आहेत ?

a) ही संज्ञा तीव्र बेरोजगारी दर्शवते. b) ही वार्षिक संज्ञा आहे.
c) ही संज्ञा व्यक्ती दर दर्शवते. d) ही संज्ञा काळ दर दर्शवते.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (b) २) (a), (b) आणि (c) ३) (b), (c) आणि (d) ४) (a), (b) आणि (d)

३) नॅशनल सॅम्पल सर्वे संस्थेकडून (NSSO) बेरोजगारीची संकल्पना विकसित करण्यात आली आहे. खालीलप्रमाणेः

a) बेरोजगारीचा सामान्य स्थिती दर्जा b) बेरोजगारीचा चालू आठवड्याचा स्थिती दर्जा
c) बेरोजगारीचा चालू दैनंदिन स्थिती दर्जा d) बेरोजगारीचा चालू वार्षिक स्थिती दर्जा

वरीलपैकी कोणता पर्याय **चुकीचा** आहे?

१) फक्त (a) २) (a) व (c) ३) (b) व (d) ४) फक्त (d)

४) राष्ट्रीय सैम्पल सर्व्हे संस्थेकडून बेरोजगारांची संकल्पना विकसीत करण्यात आली आहे ती खालील प्रमाणे –

a) बेरोजगारीचा सामान्य स्थिती दर्जा b) बेरोजगारीचा चालू आठवड्याचा दर्जा
c) बेरोजगारीचा चालू दैनंदिन दर्जा d) बेरोजगारीचा चालू वार्षिक दर्जा

वरीलपैकी कोणता/ते पर्याय **चुकीचा/चे** आहे/आहेत ?

१) फक्त (a) २) (a) आणि (c) ३) फक्त (d) ४) (b) आणि (d)

५) सहाव्या पंचवार्षिक योजनेत (१९८०–८५) पुढीलपैकी कोणत्या बेरोजगारीचे अंदाज तयार करण्यात आले ?

a) चिरकालीन बेरोजगारी b) साप्ताहिक स्थितीतील बेरोजगारी
c) दैनंदिन स्थितीतील बेरोजगारी d) वार्षिक स्थितीतील बेरोजगारी

**पर्यायी उत्तरे :**

१) (a),(b) आणि (c) २) (b),(c) आणि (d) ३) (a),(b) आणि (d) ४) सर्व चार

६) २०११ – १२ साली सर्वसाधारण लोकसंख्येच्या २ ते ४% असणारा बेरोजगारीचा दर :

a) उच्च शिक्षणाबरोबर वाढतो. b) स्त्रियांमध्ये अधिक दिसतो.
c) उच्च शिक्षणाबरोबर कमी होतो. d) स्त्रियांमध्ये कमी दिसतो.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) फक्त　　२) (a) आणि (b)　　३) (c) आणि (d)　　४) (d) फक्त

७) ग्रामीण विभागात आढळून येत असलेल्या बेरोजगारीचा मुख्य प्रकार कोणता ?

१) संरचनात्मक बेरोजगारी　　२) कमी प्रतीची बेरोजगारी

३) प्रच्छन्न व मोसमी बेरोजगारी　　४) चक्रीय व सुशिक्षित बेरोजगारी

८) भारतातील बेरोजगारीच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान खरे नाही ?

१) भारतात अजून छुपी बेरोजगारी आहे.

२) भारतात चक्रीय बेरोजगारी आहे.

३) भारतातील बेरोजगारी मुख्यत्वेकरून संरचनात्मक आहे.

४) भारतातील रोजगार विषयक आकडेवारी गोळा करणारी एन.एस.एस.ओ. ही महत्त्वाची संस्था आहे.

९) भारतात सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार निर्मितीत प्रामुख्याने खालील तीन क्षेत्रांचा वाटा आहे :

१) a) खाणकाम　　b) वीज आणि पाणी　　c) समुदाय आणि सामाजिक सेवा

२) a) खाणकाम　　b) लघुउद्योग　　c) शैक्षणिक संस्था

३) a) खाणकाम　　b) वीज　　c) संरक्षण

4) a) खाणकाम　　b) सामाजिक सेवा　　c) पोलीस प्रशासन

## ३) प्रादेशिक असमतोल

१) समतोल प्रादेशिक वाढीसाठी, दहाव्या पंचवार्षिक योजनेतील नवीन उपक्रम म्हणजे :

१) ''राष्ट्रीय समान उन्नती योजने' ची स्थापना

२) स्वर्णजयंती स्वयंरोजगार योजनेअंतर्गत साधनसामग्रीचे हस्तांतर

३) गरीब राज्यांसाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन

४) विशेष विभाग उन्नती कार्यक्रम.

२) भारतीय नियोजन मंडळाने प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी धोरणात्मक उपाय योजना स्वीकारलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे :

a) मागास प्रदेशाचा प्रत्यक्ष विकास करण्यासाठी विशेष क्षेत्र विकास कार्यक्रम राबविणे.

b) मागास प्रदेशातील उद्योग प्रकल्पांना सवलतीचा वित्तपुरवठा स्टेट बँक ऑफ इंडिया कडून देणे.

c) मागास प्रदेशात खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे.

वरील कोणते/ती विधाने/ने बरोबर आहे/आहेत ?

१) (a) आणि (c)　　२) (b) आणि (c)　　३) फक्त (a)　　४) (a),(b) आणि (c)

३) मागासलेल्या पूर्व उत्तर प्रदेशातील गोरखपूर बाबत काय खरे आहे?

a) जॅपनीज इनसिफॅलायटीस मुळे दर वर्षी शेकडो मुले मरण पावतात म्हणून बदनाम.

b) पश्चिम बंगालच्या खरगपूर पेक्षा अधिक लांब व जगातील सर्वांत लांब प्लॅटफॉर्म येथे होत आहे.

c) कधीकाळी गुंडांच्या टोळी युद्धांमुळे पूर्वेचे शिकागो म्हणून बदनाम

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (b)　　२) (b) आणि (c)　　३) (a) आणि (c)　　४) (a), (b) आणि (c)

## ३) भारतातील नियोजन

१) नियोजनाचे प्रकार व तर्काधार

२) नियोजन आयोग

३) नीती आयोग

## १) नियोजनाचे प्रकार व तर्काधार

१) आदेशात्मक नियोजन करणे म्हणजे काय?

१) आदेशात्मक नियोजनामध्ये उत्पादनाच्या माध्यमांवर राज्याचे पूर्ण नियंत्रण असते आणि देशासाठी केंद्रीय नियोजन मंडळ (प्राधिकरण) नियोजन आखते.

२) उत्पादनाच्या माध्यमांवर राज्याचे पूर्ण नियंत्रण असते, तथापि नियोजन विकेंद्रित असते.

३) सरकारने आखलेल्या नियोजनानुसार विविध आर्थिक कार्ये करण्यासाठी संयोजक वर्गाला राज्य निर्देशन देते.

४) केंद्रीय नियोजन प्राधिकरण असते, तथापि बाजारी शक्तींना अर्थ व्यवस्थेमध्ये कार्य करण्यासाठी परवानगी असते.

२) बाराव्या पंचवार्षिक योजने पूर्वीचे भारतीय नियोजनाबाबत खालील विधाने विचारात घ्या :

a) भारतीय नियोजन हे सूचक आर्थिक नियोजन आहे.

b) भारतीय नियोजन हे भौतिक नियोजन आहे.

c) भारतीय नियोजन हे सामाजिक नियोजन आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **सत्य** आहे/आहेत ?

१) (a) आणि (b) २) (b) आणि (c) ३) (a) आणि (c) ४) वरील सर्व

**३**) खालीलपैकी कोणते घटक भारतामधील आर्थिक नियोजनाचे अपयश आहेत?

a) अल्प दरडोई उत्पन्न आणि वृद्धिदर b) दारिद्र्य आणि बेकारी

c) संथ औद्योगिकरण d) उत्पन्न आणि संपत्तीमधील विषमता

**पर्यायी उत्तरे :**

१) (b), (d) आणि (c) २) (a) आणि (b) ३) (a), (b) आणि (c) ४) (b) आणि (d)

४) खालीलपैकी कोणता/ते घटक भारतीय नियोजनाचे अपयश दर्शवितो/दर्शवितात ?

१) सर्व नोकरी करण्यास सक्षम लोकांनी रोजगार पुरविण्यात अपयश

२) जमीन सुधारणांची कार्यवाही करण्यात अपयश.

३) काळ्या पैशाची वाढ रोखण्यात अपयश

४) वरीलपैकी सर्व

५) भारतीय नियोजन अयशस्वी होण्याची प्रमुख तीन कारणे कोणती ?

a) सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षम उत्पादन. b) व्यावसायिक संरचनेत न झालेला बदल.

c) दारिद्र्य निर्मूलनातील अपयश. d) महालनोबिस प्रतिमानाचा अयोग्य वापर.

**पर्याय :**

१) (a),(b) व (d) २) (b),(c) आणि (d) ३) (a),(b) आणि (c) ४) (c),(d) आणि (a)

## २) नियोजन आयोग

१) नियोजन आयोगाच्या मते ''सार्वजनिक बचतीत वाढ होऊन अत्यावश्यक सार्वजनिक गुंतवणूक अल्प राजकोषीय तुटीतून साध्य होईल ही मध्यम कालीन राजकोषीय धोरणाचे उद्दिष्ट होते. सुधारणांचा हा भाग दुर्दैवाने कधीच अंमलात आला नाही''. याचे कारण म्हणजे.

a) मोठे सार्वजनिक कर्ज b) उच्च व्याज दर

c) ऋण (उणे) सार्वजनिक बचती d) जागतिकीकरण

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (c) २) (b) only ३) (b) आणि (d) ४) (a),(b) आणि (c)

२) भारतात आर्थिक नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने रुजावे यासाठी सर्वप्रथम प्रयत्नात येतात :

a) श्री एम एन रॉय यांचे पुस्तक ''प्लॅन्ड इकॉनॉमी फॉर इंडिया''

b) श्री विश्वेश्वरय्या यांचे ''टेन ईअर पीपल्स प्लॅन''

वरील कोणते विधान **योग्य** आहे ?

१) केवळ (a) २) केवळ (b) ३) दोन्ही ४) एकही नाही

## भारताच्या पंचवार्षिक योजनांचा आढावा, मूल्यमापन

१) खालील विधाने विचारात घ्या :

a) 'वृद्धीसह सामाजिक न्याय आणि समानता' यावर नवव्या योजनेने भर दिला.

b) दहाव्या योजनेचे अर्थव्यवस्थेचा वार्षिक वृद्धी दर ८% चे उद्दिष्ट होते.

c) 'पायाभूत विकास' यावर दुसऱ्या योजनेत भर देण्यात आला.

वरीलपैकी कोणते/ती विधाने/ने बरोबर आहे/आहेत ?

१) (a) आणि (b) २) (b) आणि (c) ३) फक्त (a) ४) फक्त (c)

२) काही पंचवार्षिक योजनांकरिता विकासाच्या उद्दिष्टांची टक्केवारी व प्रत्यक्षात आत्मसात विकासाची टक्केवारी पुढे दिली आहे. यातील कोणते विधान चुकीचे आहे?

| | **उद्दिष्ट** | **प्रत्यक्षात** |
|---|---|---|
| १) प्रथम योजना (१९५१-५६) | २.१ | ३.६ |
| २) चौथा योजना (१९६९-७४) | ५.७ | २.०५ |
| ३) आठवी योजना (१९९२-९७) | ५.६ | ६.६८ |
| ४) दहावी योजना (२००२-२००७) | ८.० | ९.७ |

३) महाराष्ट्र राज्याचा दहाव्या पंचवार्षिक योजनेतील स्थूल उत्पादनातील सरासरी चक्रवाढ वृद्धीदर (ACGR) किती होता?

१) ८.३ टक्के २) ८.६ टक्के ३) ८.७ टक्के ४) ८.२ टक्के

४) जोड्या जुळवून **योग्य** पर्याय शोधा :

| **योजना** | **उद्दिष्ट्य** |
|---|---|
| a) पहिली पंचवार्षिक योजना | i) जलद औद्योगीकरण |
| b) दुसरी पंचवार्षिक योजना | ii) जीवनमानाचा दर्जा उंचावणे |
| c) पाचवी पंचवार्षिक योजना | iii) शेतीला प्राधान्य |
| d) दहावी पंचवार्षिक योजना | iv) गरिबी हटाव |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| २) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| ३) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| ४) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

५) १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये (२०१२-१७), नियोजन आयोगाने पायाभूत विकासासाठी अंदाजे रु. ४५ लक्ष कोटींची गुंतवणुकीची तरतूद केली आहे. या गुंतवणुकीपैकी खाजगी गुंतवणुकीचा वाटा किती आहे?

१) कमीत कमी ५०% २) ६०% ३) कमीत कमी ४५% ४) ७५%

६) १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये पायाभूत क्षेत्रामधील अंदाजे गुंतवणूक किती आहे?

१) ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये केलेल्या गुंतवणुकीच्या दुप्पट.

२) ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये केलेल्या गुंतवणुकीच्या १२०%
३) ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये केलेल्या गुंतवणुकीच्या १५०%
४) वरीलपैकी एकही नाही

७) दहाव्या पंचवार्षिक योजनेत कोणते क्षेत्र 'गाभा क्षेत्र' मानण्यात आले?
a) औद्योगिक क्षेत्र
b) शिक्षण क्षेत्र
c) पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा
d) कृषी क्षेत्र
दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा.
**पर्यायी उत्तरे :**
१) (a) फक्त २) (a) आणि (c) ३) (b) फक्त ४) (d) फक्त

८) भारताच्या दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये कोणते लक्ष्य निश्चित केले नव्हते?
a) दारिद्र्यात घट
b) सहकारास प्रोत्साहन
c) वृद्धिदर आणि रोजगारात वाढ
d) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण
वरीलपैकी कोणते/कोणती विधान/ विधाने बरोबर आहे/आहेत?
१) (a) फक्त २) (b) फक्त ३) (c) आणि (d) ४) (d) आणि (a)

९) बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टिकोनावर खालील बाबतीत टिका केली जाते.
a) दारिद्र्याच्या समस्येकडे दुर्लक्ष
b) वृद्धीचे लक्ष्य साध्य करण्यासारखे नाही.
c) अवास्तव वित्तीय रचना
d) समानतेकडे दुर्लक्ष
**पर्यायी उत्तरे :**
१) (a), (b) आणि (c) २) (b) आणि (c) ३) (c) आणि (d) ४) (d) आणि (c)

१०) भारताच्या दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खालील वाक्य निश्चित केलेले ***नव्हते*** :
१) दारिद्र्यात घट
२) सहकारास प्रोत्साहन
३) वृद्धी दर व रोजगारात वाढ
४) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

११) सामाजिक, आर्थिक व लिंग सबलीकरण ही स्त्रियांच्या सबलीकरणाची त्रिसूत्री योजना कोणत्या पंचवार्षिक योजनेत स्वीकारण्यात आली?
१) आठवी योजना २) नववी योजना ३) दहावी योजना ४) अकरावी योजना

१२) ...... पंचवार्षिक योजनेत सिंचनाचा वाटा एकूण खर्चाच्या २५% पेक्षा जास्त होता.
१) सहावी पंचवार्षिक योजना
२) सातवी पंचवार्षिक योजना
३) आठवी पंचवार्षिक योजना
४) वरील सर्व


# THIS SAMPLE IS OVER

To buy complete MPSC Mains GS I course click on the link below -
https://www.studycircleonline.com/notes/GSIV-AGRI-ECO/156
https://www.studycircleonline.com/notes/GSIV-INDIAN-ECONOMY/158
https://www.studycircleonline.com/notes/GSIV-S-T/157
https://www.studycircleonline.com/courses/mpsc-mains-20-21-gs-iv/17
To buy complete MPSC Mains course incusive of the complete syllabus click on the link below-
https://www.studycircleonline.com/courses/mpsc-mains-20-21-complete-course-/13
or visit www.studycircleonline.com